# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:18.04.2025** **वार:शुक्रवार**

1. वक्फ कायद्यासंदर्भात पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिषदेवर कोणतीही नियुक्ती करणार नाही-केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयासमोर हमी
2. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर
3. गुड फ्रायडे निमित्ताने आज प्रभू येशू ख्रिस्ताच्या बलिदानांचं स्मरण
4. कैलास मानसरोवर यात्रा लवकरच पुन्हा सुरू होण्याची शक्यता-परराष्ट्र व्यवहार मंत्रालायचे संकेत आणि
5. आय पी एल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाकडून सनरायझर्स हैदराबाद संघाचा पराभव

**वक्फ सुप्रीम कोर्ट**

वक्फ दुरुस्ती कायदा, 2025 संदर्भात पुढील सुनावणी होईपर्यंत, म्हणजे येत्या 5 मे पर्यंत केंद्र सरकारकडून वक्फ मंडळावर अथवा केंद्रीय वक्फ परिषदेवर कोणत्याही नवीन नियुक्त्या केल्या जाणार नाहीत तसंच वक्फच्या वापरात असलेल्या जागांसह सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व वक्फ मालमत्तांचा दर्जाही काही काळ जैसे थे राहील असे हंगामी आदेश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के.व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं हे आदेश दिले आहेत. या खंडपीठानं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्याकडून वक्फ मंडळांवर नियुक्त्या केल्या जाणार नाहीत अशी हमीही घेतली आहे.

1995 च्या वक्फ कायद्यात अलीकडेच करण्यात आलेल्या सुधारणांना स्थगिती द्यावी अशी मागणी करणाऱ्या किंवा नव्या सुधारित कायद्याच्या दुरुस्तीला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केंद्रानं सात दिवसात उत्तर द्यावं असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. वक्फ कायद्याबाबत खूप मोठ्या संख्येनं याचिका दाखल झाल्या असल्यामुळे खंडपीठानं याचिकाकर्त्यांना ज्यांची न्यायालयात सुनावणी होण्याची आवश्यकता आहे अशा पाच प्रमुख याचिकांची निवड करण्यास सांगितलं आहे. दरम्यान नवीन वक्फ सुधारणा कायदा अंमलात आणल्याबद्दल दाऊदी बोहरा समाजाच्या एका शिष्ट मंडळानं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

**यमुना मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं यमुना नदीच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत नदी स्वच्छतेसाठी संस्था-निहाय कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला. सांडपाणी व्यवस्थापन, यमुना नदीचा प्रवाह सुधारणे, पूरक्षेत्र संरक्षण आदि मुद्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली. यमुना नदीची स्वच्छता आणि पुनरुज्जीवन तसेच दिल्लीच्या पिण्याच्या पाण्याशी संबंधित समस्या सोडवण्याला प्राधान्य देणार असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमांवरील संदेशांत म्हटलं आहे. दिल्लीकरांसाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि त्यांचे जीवन सुलभ करण्यासाठी केंद्र सरकार दिल्ली सरकारसोबत काम करेल असंही मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, दिल्लीच्यामुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वरिष्ठ सरकारी अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**राजनाथ सिंह-छ. संभाजीनगर**

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. छत्रपती संभाजी नगर शहरातील सिडको परिसरातील कॅनॉट उद्यानात उभारण्यात आलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचं त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात येईल. तसंच आपल्या दौऱ्यात ते उद्योजकांशीही संवाद साधणार आहेत. त्यानंतर संरक्षणमंत्री लखनौला रवाना होणार आहेत.

**जलशक्ती**

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी काल नवी दिल्लीत गोड्या पाण्यातल्या जैव-विविधतेच्या संरक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या डिजीटल व्यासपीठाचा आरंभ केला. या माध्यमातून गंगा, कावेरी आणि गोदावरी सारख्या प्रमुख नद्यांच्या भौगोलिक संरचना, जैव विविधता आणि सार्वजनिक सहभागातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती मिळणार आहे. यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वच्छ गंगा प्रकल्पातंर्गत, देशातल्या वन्यजीव संस्थांच्या विविध योजनांचा आढावाही घेतला.

**जागतिक वारसादिन**

आज जागतिक वारसा दिन आहे. 'आपत्ती आणि संघर्षांमुळे धोक्यात आलेला वारसा' ही या वर्षीच्या वारसा दिनाची संकल्पना आहे. सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचा सन्मान आणि संरक्षण करण्यासाठी साजरा केला जातो दरवर्षी 18 एप्रिल रोजी हा दिवस साजरा केला जातो. गेल्या काही वर्षांत, जागतिक वारसास्थळांच्या यादीत भारतातील स्थळांनी स्थान पटकावलं आहे. जागतिक वारसा यादीत सध्या भारतातील 43 स्थळं आहेत. दरम्यान, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग अर्था ए एस आय ने आजच्या जागतिक वारसा दिनानिमित्त देशभरातील सर्व ASI-संरक्षित स्मारकांमध्ये मोफत प्रवेश जाहीर केला आहे.

**गुडफ्रायडे**

'गुड फ्रायडे' निमित्ताने आज प्रभू येशूख्रिस्ताच्या बलिदानाचं जगभरात स्मरण केलं जात आहे. हा दिवस ख्रिश्चन धर्मीयांमध्ये शोक, चिंतन आणि आध्यात्मिक भक्तीचा मानला जातो. या दिवसानिमित्त चर्चमध्ये विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आल्या आहेत.

**वेव्ज-अमिताभ बच्चन**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे 1 ते 4 मे दरम्यान, मुंबईत, जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषद अर्थात वेव्ज चं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेत माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येनं या परिषदेत सहभागी होण्याचं आवाहन प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांनी केलं आहे.....

**नमस्कार आज भी लोग मुझसे पुछते है, के सिनेमा का असली मतलब क्या है | मे केहता हुं के सिनेमा सिर्फ एक कहानी नही एक एहसास है | जो दिल तक जाये जो यादो मै रहे ये दुनिया को जोड दे | वर्ल्ड ओडीओ व्हिज्युअल एंड एन्टरटेनमेंट समिट इज नेक्स chapter ऑफ द जर्नी, जहा सिर्फ एन्टरटेनमेंट ही नही, एक नया युग लिखा जायेगा तो क्या आप इस कहानी का हिस्सा बनने के लिये तयार है |**

**मेलोनी-कर**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी अमेरिका आणि युरोपमधील संभाव्य व्यापार कराराबद्दल आशावाद व्यक्त केला आहे. दोन्ही नेत्यांच्या बैठकीनंतर घेण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्यांनी संरक्षण खर्च, स्थलांतर आणि कर लावण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाल्याचं सांगितलं. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आयातीवर 20 टक्के कर लादल्यानंतर आणि नंतर तो स्थगित केल्यानंतर अमेरिकेला भेट देणा-या मेलोनी या पहिल्या युरोपीय नेत्या आहेत. अमेरिकेने लावलेला कर पूर्णपणे चुकीचा असल्याचं विधान मेलोनी यांनी यापूर्वी केलं होतं.

**जयस्वाल**

कैलास मानसरोवर यात्रा लवकरच पुन्हा सुरू होण्याची शक्यता असल्याचं परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. या बाबत मंत्रालयातर्फे लवकरच सूचना जारी करण्यात येईल असं ते म्हणाले. बँक घोटाळ्यातला आरोपी, हिरेव्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणासाठी केंद्रसरकार बेल्जियमबरोबर चर्चा करत असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. 26-11 च्या मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाचं प्रत्यार्पण हा पाकिस्तानसाठी खणखणीत संदेश आहे, या हल्ल्यातल्या इतर आरोपींना पाठीशी घालणं बंद करावं आणि, 2008 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांवर कारवाई करावी अशी मागणी जयस्वाल यांनी यावेळी बोलताना केली.

**एम्स-क्रमवारी**

जगातील सर्वोत्तम रुग्णालयांच्या 2024 वर्षाच्या क्रमवारीत नवी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्स ने जागतिक क्रमवारीत, सर्वोत्तम रुग्णालय म्हणून 97वं स्थान पटकावलं आहे. न्यूजवीक आणि स्टेटिस्टा या संस्थांनी जगभरातील 2 हजार 400 रुग्णालयांच्या केलेल्या सर्वेक्षणानंतर ही क्रमवारी जाहीर केली आहे. रुग्ण समाधान, रोग निदान, स्वछता मानके आणि आरोग्यसेवेतील व्यावसाईकांच्या शिफारशी यानुसार ही क्रमवारी देण्यात आली आहे.

**स्मार्टफोन निर्यात**

गेल्या आर्थिक वर्षात भारताची स्मार्टफोन निर्यात दोन लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज मध्यमांवरील संदेशांत ही माहिती दिली आहे. 2013-14 मध्ये देशाची स्मार्टफोन निर्यात 167 व्या क्रमांकावर होती आणि आता ती पहिल्या क्रमांकावर पोहोचली आहे असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारने स्मार्टफोनसाठी उत्पादनासंबंधित केलेल्या प्रोत्साहन योजनेचं हे फलित असून, यामुळे लाखो नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत असंही ते पुढे म्हणाले.

**आयपीएल**

आय पी एल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्स संघाने सनरायझर्स हैदराबाद संघाचा चार गाडी राखून पराभव केला. मुंबईतील वानखेडे मैदानावर झालेल्या या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने दिलेल्या 163 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्स संघाने, 18 षटकं आणि 1 चेंडूत, 6 गडी गमावून, 166 धावा फटकावल्या. आज बेंगळुरू मधील चिन्नास्वामी मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्स या संघांदरम्यान सामना होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.